आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२९ ऑगस्ट २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री उझबेकिस्तान आणि किर्गिझ प्रजासत्ताकच्या दौऱ्यावर रवाना

- नेपाळमधे अडकलेल्या राज्यातल्या ४३८ पर्यटकांपैकी ३३८ जण सुरक्षित / पुरातल्या मृतांची संख्या ६२६

आणि

- राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांना देशाची आदरांजली

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज उझबेकिस्तान आणि किर्गिझ प्रजासत्ताकच्या चार दिवसांच्या दौऱ्यासाठी रवाना झाले. या दोन्ही देशांच्या भेटीमुळे मध्य आशियामधली भारताची धोरणात्मक भागीदारी आणि या प्रदेशाबरोबरचे सांस्कृतिक बंध दृढ होतील असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी रवाना होण्यापूर्वी जारी केलेल्या निवेदनात व्यक्त केला. अलिकडे भारत आणि उझबेकिस्तान दरम्यान धोरणात्मक भागीदारीमध्ये उल्लेखनीय प्रगती झाली असून व्यापार, गुंतवणूक, डिजिटल संपर्कव्यवस्था, संरक्षण आणि ऊर्जा या क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्यासाठी उझबेकिस्तानचे अध्यक्ष मिर्झियोयेव्ह यांच्याशी चर्चा करणार असल्याचं मोदी यांनी सांगितलं. या दौऱ्यात ते शास्त्री स्मारक आणि महात्मा गांधी केंद्रालाही भेट देणार आहेत. त्यानंतर किर्गिझ प्रजासत्ताकच्या दौऱ्यात प्रधानमंत्री मोदी शांघाय सहकार्य संघटनेच्या २६व्या शिखर परिषदेत सहभागी होणार असून किर्गिझ प्रजासत्ताकाचे अध्यक्ष सदिर झापारोव्ह यांच्यासह इतर नेत्यांशी महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर चर्चा करणार आहेत.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आकाशवाणीच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून उद्या सकाळी ११ वाजता देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १३७ वा भाग असेल. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनचं संपूर्ण नेटवर्क, न्यूजऑनएआयआर वेबसाइट आणि मोबाइल ॲपवर प्रसारित केला जाईल.याशिवाय एआयआर न्यूज, डीडी न्यूज, प्रधानमंत्री कार्यालय तसंच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब चॅनेलवरही या

कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण केलं जाईल. तर हिंदीतील प्रक्षेपणानंतर लगेचच आकाशवाणीद्वारे हा कार्यक्रम प्रादेशिक भाषांमध्येही प्रसारित केला जाईल.

<><><><>

नेपाळमधे अडकलेल्या राज्यातल्या ४०४ पर्यटकांपैकी ३३८ जणांशी संपर्क झाला असून त्यातले ३७ जण मायदेशी परत यायला निघाले आहेत. मुंबईच्या एका पर्यटन संस्थेमार्फत गेलेल्या ६० पर्यटकांचा अद्याप पत्ता लागला नसल्याचं राज्यशासनाच्या पत्रकात म्हटलं आहे. राज्याच्या विविध भागातून गेलेले १४९ पर्यटक चीन किंवा तिबेटमधे सुरक्षित असल्याचं परराष्ट्रव्यवहार मंत्रालयानं कळवलं असून त्यांची यादी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पाठवली आहे.

राज्यातल्या १०० भाविकांची बिहार राज्यसरकारच्या मदतीने सुखरूप सुटका करण्यात आली. नेपाळहद्दीवरुन काल त्यांना सुरक्षाव्यवस्थेसह बिहारमधे आणलं. त्यांच्या भोजन आणि निवासाची व्यवस्था करुन त्यांना आज सकाळी साडेसातवाजता रेल्वे गाडीने महाराष्ट्राकडे रवाना करण्यात आलं.

नेपाळमधे पुरातल्या बळींची संख्या आता ६२६ झाली आहे. अजूनही सुमारे २००० लोकांचा थांगपत्ता लागलेला नाही. तर सुमारे ५००० लोकांशी संपर्क तुटल्याची भीती आहे. हिमालयीन क्षेत्रात बचावकार्य सुरु असून अनेक ठिकाणी मृतदेह हाती लागत आहेत. ओळख न पटलेल्या मृतदेहांचं दफन करण्याचा निर्णय नेपाळ सरकारने घेतला आहे. या सर्व मृतदेहांचे डीएनए नमुने दफनापूर्वी घेतले जातील असं नेपाळ सरकारने म्हटलं आहे. पुरामुळे संपर्क तुटल्याने विविध ठिकाणी अडकून पडलेल्या अडीचहजारापेक्षा जास्त लोकांना सुखरुप बाहेर काढण्यात आलं. रसुवा जिल्ह्यातल्या जलविद्युत प्रकल्पात काम करणारे कामगार बोगद्यात अडकले असून,त्यांच्या सुटकेसाठी भारताने तंत्रज्ञांचं पथक आणि इतर साहित्य पाठवलं आहे. आतापर्यंत भारताने एकूण साडेसत्तावन्न टन मदतसाहित्य नेपाळला पाठवलं आहे.

<><><><>

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी उत्तराखंडमधे हलद्वानी इथं सभा घेतल्यानंतर त्या ठिकाणी शुद्धीकरण करण्यात आल्याप्रकरणी संबंधितांविरोधात अनुसूचित जाती - जमाती कायद्यांतर्गत एफआयआर दाखल करावा, अशी मागणी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी

आज केली. नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. शुद्धीकरण हा गुन्हा आहे, असं ते म्हणाले.

***होल्ड... बाईट- राहुल गांधी***

**<><><><><>**

पावसानं ओढ दिल्यानं मराठवाड्यात झालेल्या पीक नुकसानीचे पंचनामे करावेत आणि पात्र शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी अशी मागणी शिवसेनेचे खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांनी राज्य सरकारकडे केली आहे. यासंदर्भात निंबाळकर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्रही लिहीलं आहे.

मराठवाड्यातील काही भागांत गेल्या ४५ दिवसांपासून अत्यल्प पाऊस झाला आहे. पाण्या टंचाईमुळे सोयाबीनचे पीक वाळून गेलं असून, त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानीचा सामना करावा लागत असल्याचं त्यांनी या पत्रात म्हटलं आहे. नुकसानीचा योग्य अंदाज घेण्यासाठी महसूल आणि कृषी विभागाच्या माध्यमातून पंचनामे करण्याची गरजही त्यांनी या पत्रातून व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय क्रीडा दिन आज साजरा केला जात आहे. देशात क्रीडा संस्कृतीला चालना देण्याच्या उद्देशानं हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचा २९ ऑगस्ट हा जन्मदिन २०१२ पासून राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो.

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमीत्त उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन,प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि इतर मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या आहेत, तसंच ध्यानचंद यांना आदरांजली वाहिली आहे.

केंद्रीय युवा आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी नवी दिल्ली इथं मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली. फिट इंडिया चळवळीला पुढची दिशा देण्याच्या उद्देशाने देशभरात ‘खेळाच्या मैदानात एक तास’ या उपक्रमाचं आयोजन केलं असल्याची माहिती त्यांनी दिली.

**- - HOLD BYTE - MANSUKH MANDVIYA - - -**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही क्रीडादिनानिमित्त सलग तीन वेळा ऑलिम्पिक सुवर्णपदक जिंकून देणारे मेजर ध्यानचंद यांना अभिवादन केलं आहे.

<><><><>

२०३६च्या ऑलिम्पिकमध्ये भारताचा सहभाग आणि पदकसंख्या वाढवण्यासाठी लहान वयापासूनच क्रीडा क्षेत्रातली प्रतिभा शोधायची गरज आहे, असं प्रतिपादन केंद्रीय हवाई वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज केलं. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांवरच्या विशेष टपाल आवरणाच्या प्रकाशनाच्या कार्यक्रमात ते पुण्यात बोलत होते. देशातल्या क्रीडा संघटना, ऑलिम्पिक संघटना आणि वेगवेगळ्या क्रीडा मंडळांनी ५ ते १५ वर्षं वयोगटातल्या मुलांमधले क्रीडा गुण हेरावेत, लहान वयातच गुणवान खेळाडूंचा शोध घेऊन त्यांना योग्य प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असं त्यांनी सुचवलं.

क्रीडा दिनानिमित्त आज नंदुरबार इथं मेजर ध्यानचंद चषक हॉकी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यात मुलांचे ८ आणि मुलींचे ६ अशा एकंदर १४ संघांनी भाग घेतला.

<><><><>

भालाफेकपटू नीरज चोप्रा, स्नायूच्या दुखापतीमुळे उर्वरित हंगाम आणि आगामी आशियाई क्रीडा स्पर्धांमधून बाहेर पडला आहे. प्रशिक्षणादरम्यान ही दुखापत झाल्याची माहिती नीरजनं समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये दिली. काहीच दिवसांपूर्वी तो डायमंड लीग स्पर्धेसाठी पात्र ठरला होता, पण आता याही स्पर्धेत तो खेळू शकरणार नाही.

<><><><>

भारताच्या वेलावन सेंथिलकुमार यानं हंगेरी इथं झालेल्या पीएसए बुडापेस्ट खुल्या स्क्वॉश स्पर्धेचं जेतेपद पटकावलं. काल रात्री झालेल्या अंतिम सामन्यात त्यानं हंगेरीच्या बालाज फरकास याच्यावर ३-० अशी मात केली.

<><><><>

मुंबई क्रिकेट संघटनेच्या परिसरातल्या ५ उपहारगृहांचे परवाने रद्द करणारा आदेश मागे घेऊ, असं महाराष्ट्र अन्न आणि औषध प्रशासनानं आज मुंबई उच्च न्यायालयाला सांगितलं.

//<><><><><>//